# फ्लिपकार्ट ग्राहकांची सुरक्षा आणि मागणी पूर्ण करण्यासाठी भारतभरात ग्रोसरी विभागाला देणार बळकटी

- *लखनऊ, पुणे, अहमदाबाद, दिल्ली, बंगळुरु, चेन्नई, मुंबई, हैदराबाद, कोलकाता आणि पटणा या शहरांमध्ये गेल्या काही महिन्यात वाणसामानाच्या फुलफिलमेंट सेंटरची क्षमता वाढवण्यात आली आहे*
- *दिल्ली, कोलकाता, चेन्नई, कोइंबतूर आणि हैदराबादमधील फुलफिलमेंट सेंटरची क्षमता ८ लाख चौ. फुटांहून अधिक वाढवण्याची योजना*
- *फुलफिलमेंट सेंटर्सच्या अतिरिक्त क्षमतेमुळे फ्लिपकार्टला दररोज ७३,००० हून अधिक वाणसामानाच्या ऑर्डर्स पूर्ण करता येतील*

**बंगळुरु - ११ मे २०२१ :** फ्लिपकार्ट या भारतातील एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठेने आज देशभरातील आपल्या वाणसामान पुरवठा साखळीच्या सुविधेला बळकटी देणार असल्याची घोषणा केली आहे. या माध्यमातून कंपनी आपल्या ग्राहकांना जलद आणि संपर्करहित, दारापर्यंत येणाऱ्या डिलिव्हरीच्या माध्यमातून त्यांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तू सुरक्षित आणि सहजसाध्य पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी आपल्या क्षमता अधिक बळकट करणार आहे.

या प्रयत्नांच्या संदर्भात फ्लिपकार्टने आपल्या वाणसामान विभागासाठी पुरवठा साखळी सुविधा वृद्धिंगत करण्याची योजना आखली आहे आणि पुढील तीन महिन्यांच्या काळात ५ नव्या फुलफिलमेंट सेंटर्सच्या माध्यमातून ८ लाख चौ. फुटांहून अधिक जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. या अतिरिक्त सुविधेमुळे या कंपनीला देशभरातील अधिकाधिक वापरकर्त्यांपर्यंत ऑनलाइन वाणसामान खरेदीची सुविधा नेता येणार आहे.

फ्लिपकार्ट ग्रोसरीमध्ये २०० हून अधिक विभागांमध्ये ७००० हून अधिक उत्पादने आहेत- यात दैनंदिन घरगुती वापराच्या वस्तू, धान्य, खाद्यपदार्थ आणि पेये, कन्फेक्शनरी, पर्सनल केअर आणि इतर अनेक वस्तूंचा समावेश आहे. फ्लिपकार्ट वाणसामान व्यवसायाला वाणसामानाच्या खरेदीसाठी व्हॉईस अनेबल्ड सेवा, क्रेडिटची सोय आणि ओपन बॉक्स डिलिव्हरी अशा सोयी देत वापरकर्त्यांच्या अनुभवाला अधिक समृद्ध करण्यात आले आहे.

दिल्ली, मुंबई, बंगळुरु, चेन्नई आणि हैद्राबाद अशा अनेक शहरांमध्ये सध्याचे वाणसामानासाठीच्या फुलफिलमेंट सेंटर्सचे जाळे पसरले आहे. यातून दररोज सुमारे ६४००० ऑर्डर्स पूर्ण केल्या जातात. यातून रोजगाराच्या हजारो प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संधी निर्माण होऊन रोजगार आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. फ्लिपकार्टच्या वाणसामान उद्योगाच्या शाश्वत वाढीने स्थानिक अन्नप्रक्रिया उद्योगाला बळकटी दिली आहे. त्यामुळे भारतातील कृषीक्षेत्र आणि छोट्या तसेच मध्यम शेतकऱ्यांना फार मोठे पाठबळ लाभले आहे.

**फ्लिपकार्टच्या ग्रोसरी विभागाच्या उपाध्यक्ष स्मृती रविचंद्रन** म्हणाल्या, "*या आव्हानात्मक काळात ई-कॉमर्स हे खरेदीसाठीचे एक सुरक्षित माध्यम म्हणून उदयास आले आहे. फ्लिपकार्ट ग्रूपच्या प्रयत्नांमध्ये ग्राहकांची सुरक्षा नेहमीच केंद्रस्थानी आहे आणि आमच्या नव्या वाणसामान पुरवठा साखळी सुविधेमुळे आम्हाला देशातील अधिकाधिक ग्राहकांना सेवा देता येईल, ग्राहकांना दैनंदिन गरजेच्या वस्तू सहज मागवता येतील आणि संपर्करहित डिलिव्हरीची*

*सोयही मिळेल. देशभरात मालाचा पुरवठा योग्य असावा आसाठी आम्ही सातत्याने ब्रँड आणि बाजारपेठ भागीदारांच्या संपर्कात असतो.*"

मागील महिन्यात फ्लिपकार्टने फ्लिपकार्ट क्विक ही आपली हायपरलोकल सेवा दिल्ली, गुरगाव, गाझियाबाद, नोएडा, हैदराबाद आणि पुणे अशा सहा नव्या शहरांमध्ये सुरू केली. यामुळे ग्राहकांना फळे आणि भाज्या यासारख्या दैनंदिन गरजेच्या वस्तू ऑर्डर करून ९० मिनिटांच्या आत मिळवता येतील. लवचिक आणि सर्वसमावेशक कृषी पुरवठा साखळी उभारणे हा फ्लिपकार्टच्या प्रगतीशील धोरणांचा पाया ठरला आहे. तसेच, कंपनीने ताजी उत्पादने मिळवण्यावर भर दिल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आणि बाजारपेठेशी अधिक चांगल्या प्रकारे जोडले गेल्याने स्थानिक अन्नप्रक्रिया उद्योगालाही फायदा झाला. ग्राहकांच्या गरजा पूर्ण करताना ग्राहकांची आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा हा फ्लिपकार्टचा प्राधान्यक्रम आहे. त्यामुळे सुरक्षित आणि निर्जंतुक पुरवठा साखळीच्या माध्यमातून ग्राहकांच्या दारापर्यंत डिलिव्हरी दिली जाते. देशभरातील ग्राहकांना डिलिव्हरी देणाऱ्या हजारो डिलिव्हरी हिरोंनी ग्राहकांना वस्तूंच्या खरेदीसाठी घराबाहेर न पडण्याची सोय करून देत ग्राहकांना सुरक्षित ठेवले आहे. त्याचवेळी फ्लिपकार्टने लाखो विक्रेते/एमएसएमईजना त्यांची उत्पादने विकण्यासाठी एक सक्रिय बाजारपेठ उपलब्ध करून देत त्यांचे व्यवसाय सुरू राखण्यात साह्य केले. शिवाय या प्रक्रियेत लाखो रोजगार निर्माण झाले. मागील काही महिन्यात फ्लिपकार्टने उच्चतम सुरक्षेचे पालन केले आहे आणि एसओपीज निर्माण करून त्यांची अमलबजावणी केली आहे.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and Flipkart Wholesale. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 300 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratise e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more information, please contact media@flipkart.com**